सहायक वन सरंक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी)
संवर्गातील अधिकाऱ्यांची बदली.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-२०१९/प्र.क्र.३७/फ-८.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०१९.

<u>वाचा -</u> शासन आदेश महसूल व वन विभाग क्र.उब्ल्युएलपी-२०१८/प्र.क्र.४८१/फ-१
दि.१ मार्च २०१९.

<u>शासन आदेश :-</u>

शासन आदेश संदर्भाधीन दि.१ मार्च २०१९ अन्वये सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे यांच्या कार्यालयातील विभागीय वन अधिकारी (अवैध शिकार प्रतिबंधक घटक), ठाणे हे पद सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्र यांच्याकडे वर्ग करण्यात आले असून त्यांचे पदनाम विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), चांदोली राष्ट्रीय उद्यान, मुख्यालय कराड, जि. सातारा असे करण्यात आले आहे. तसेच विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), चांदोली राष्ट्रीय उद्यान, मुख्यालय कराड, जि. सातारा यांचे कार्यालयासाठी विभागीय वन अधिकारी मुल्यांकन विभाग नाशिक यांच्या अधिनस्त असलेले सहायक वनसंरक्षक मुल्यांकन नाशिक हे पद दि.१ एप्रिल, २०१९ पासून वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे सहायक वनसंरक्षक मुल्यांकन नाशिक या पदावर कार्यरत असलेले श्री.राजीव बापुराव घाडगे हे पदस्थापनेविना आहेत.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन, महाराष्ट्र वनसेवा, गट-अ (वरीष्ठ श्रेणी) मधील सहायक वनसरंक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील खाली नमूद अधिकारी यांची शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कामे पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना	शेरा
१	२	३	४
१	श्री.राजीव बापुराव घाडगे, सहायक वनसंरक्षक मुल्यांकन नाशिक	सहायक वनसंरक्षक , चांदोली राष्ट्रीय उद्यान, मुख्यालय कराड, जि. सातारा	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार सुधारीत पदस्थापना (रिक्त पदावर) (प्रशासकीय कारणास्तव)

२. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्याला नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

३. संबंधित अधिकाऱ्याला शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्याला मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

४. सदरहू बदली आदेशानुसार संबधित अधिकारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५२८११३३५८८७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7,
serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.05.28 11:40:43 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई.
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव), नाशिक / कोल्हापूर
६) विभागीय वन अधिकारी मुल्यांकन विभाग नाशिक
७) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), चांदोली राष्ट्रीय उद्यान, मुख्यालय कराड, जि. सातारा

८) महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र -१, मुंबई.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नाशिक/ सातारा.
१०) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
११) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१२) प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
१३) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
१४) वन विभागातील सर्व कार्यासने
१५) निवड नस्ती (फ-८ कार्यासन).